| MHNS240019422025 | **कौ.हिं.का.क.नं.१०६/२०२५**<br><br>**रंजना भागीरथ घोडके**<br>**वि.**<br>**कांचन देवाषिश घोडके** |
|---|---|

## निशाणी १४ वरील आदेश.

सामनेवाले यांनी प्रस्तुतचा अर्ज हा मुळ अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करण्याबाबतचा अधिनियम, २००५ **(संक्षिप्तात संरक्षण कायदा)** कायद्यातील कलम २(ए), २(एफ), २(क्यू) नुसार चालणेस पात्र नसल्यामुळे तो फेटाळणेकामी दाखल केला आहे.

२. सामनेवाला यांनी असे कथन केले आहे की, अर्जदार हिने तिची सून व सूनेचे आई व भाउ यांचेविरुध्द मुळ अर्ज दाखल केला आहे. संरक्षण कायदा हा केवळ विवाहीत महिलेंचे पति किंवा पुरुषांकडून होणा–या अत्याचारास प्रतिबंध करण्याकरीता उपयुक्त ठरतो. सदर कायद्यानुसार या कामातील अर्जदार ही पिडीत व्यक्ती नाही. सा.वाला क्र. २ व ३ यांचे अर्जदारशी कोणतेही कौटुंबिक संबंध नाही. कलम २(क्यू) प्रमाणे सा.वाला क्र.१ ही पुरुष नसल्यामुळे त्या व्याखेमध्ये समाविष्ठ होत नाही. त्यामुळे प्रस्तुत मुळ अर्ज फेटाळण्याची विनंती करण्यात आली.

३. अर्जदार यांनी त्यांनी त्यांचे म्हणणे निशाणी १४ सादर करुन अर्जास विरोध दर्शविला. अर्जदार यांच्या कथनाप्रमाणे मा.सर्वोच्च न्यायालय यांनी *"हिरल पी. हरसोरा व इतर विरुध्द कुसूम नरोत्तमदास हरसोरा व इतर" MANU/SC/1269/2016* या न्यायनिर्णयामध्ये संरक्षण कायद्यातील कलम २(क्यू) मधील सज्ञान पुरुष ही व्याख्या

वगळलेली आहे. त्यामुळे सदर संज्ञेचा विस्तार होवून त्यामध्ये महिलांचा देखील समावेश करण्यात आला आहे. सा.वाला यांनी अर्जदार यांचा कौटुंबिक हिंसाचार केला आहे. सा.वाला यांचे त्रासामुळे अर्जदार यांच्या मुलाने आत्महत्तेचा प्रयत्न केला आहे. सा.वाला हे अर्जदार व त्यांच्या कुटुंबियांबाबत मानहाणीकारक मजकूर पसरवित असतात. त्यामुळे सदर अर्ज नामंजूर करण्याची विनंती करण्यात आली आहे.

४. उभय पक्षकारांच्या विद्वान विधीज्ञांचा सविस्तर युक्तिवाद ऐकला. त्यांनी त्यांच्या अर्ज व म्हणण्याशी सुसंगत असा युक्तिवाद केला.

५. अर्ज व म्हणणे वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले असता, संरक्षण कायद्याचा मुळ उद्देश हा कुटुंबातील घडणा–या कोणत्याही स्वरुपाच्या हिंसाचारास बळी पडणा–या महिलांचा संविधानाने हमी दिलेल्या हक्कांचा अधिक प्रभावीपणे संरक्षण करणे असा आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये सा.वाला यांचे कथनाप्रमाणे सा.वाला क्र.१ ही उत्तरवादी या व्याखेमध्ये महिला असल्यामुळे येत नाही. याशिवाय, सामनेवाला क्र. २ व ३ यांचा अर्जदाराशी कोणतेही कौटुंबिक नातेसंबंध नसल्यामुळे प्रस्तूत कायद्यातील तरतूदी त्यांना लागू होत नाही. याकरीता मा.सर्वोच्च न्यायालय यांचे उपरोक्त न्यायनिवाडा *"हिरल पी. हरसोरा व इतर विरुध्द कुसूम नरोत्तमदास हरसोरा व इतर" MANU/SC/1269/2016* पाहिले असता, त्यामध्ये संरक्षण कायद्यातील कलम २(क्यू) मधील प्रौढ पुरुष हे शब्द संविधानाच्या कलम १४ मधील समानतेचा अधिकार या तत्वाच्या विरुध्द असल्यामुळे तो रद्द करण्यात आला आहे. परिणामी, सदर न्यायनिर्णयाच्या निर्देशाप्रमाणे स्त्री विरुध्द संरक्षण कायद्याअंतर्गत अनुतोषाच्या मागणी करण्याकरीता अर्ज दाखल केला जावू शकतो. या न्यायनिर्णयाप्रमाणे घरगुती हिंसा ही केवळ पुरुषांकडून होत नाही. अनेकवेळा महिला नातेवाईक व इतर सदस्य अत्याचारास सहभागी असतात. सदर न्यायनिर्णयामुळे उत्तरवादी या संज्ञेचा विस्तृत व व्यापक अर्थ स्पष्ट करण्यात आला आहे. परिणामी प्रस्तूत प्रकरणामध्ये सा.वाला क्र.१ ही केवळ महिला असल्यामुळे तिचे विरुध्द संरक्षण कायदा अंतर्गत सुनावणी होवून अनुतोषाची मागणी करता येणार नाही असा निष्कर्ष काढणे न्यायोचित ठरणार नाही. सा.वाला क्र.१ ही उपरोक्त न्यायनिर्णयाच्या

निर्देशानुसार उत्तरवादी या संज्ञमध्ये समाविष्ठ होते.

**६.** तसेच, अर्जदार ही सा.वाला क्र.१ यांची सासू आहे. सा.वाला क्र.२ ही सा.वाला क्र.१ ची आई आहे. सा.वाला क्र.३ हा सा.वाला क्र.१ चा भाउ आहे. अर्जदाराने तिच्या मुळ अर्जामध्ये सदर सा.वाला यांनी केलेल्या कौटुंबित हिंसाचाराच्या विशिष्ट तथ्यांचा तपशिलवार उल्लेख केलेला आहे. सद्यघडीस प्रस्तुत प्रकरण हे प्राथमिक स्थितीमध्ये आहे. अर्जदाराने कथित केलेल्या कौटुंबिक हिंसाचाराच्या तथ्यांबाबत त्यांना नैसर्गिक न्यायतत्वानूसार पुरावा सादर करण्याची संधी देणे आवश्यक आहे. सामनेवाला यांनी घेतलेल्या हरकती व आक्षेपांबाबत त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देखील उपलब्ध आहे. त्यामुळे प्रकरणाची या प्राथमिक स्थितीमध्ये मूळ अर्ज सुनावणी विना खारीज करणे न्यायोचित ठरणार नाही. सबब, प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करणे योग्य ठरेल. सबब, खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

अर्ज नामंजूर करण्यात येतो.

MADHUSUDAN DINKAR MAHADIK

Digitally signed by MADHUSUDAN DINKAR MAHADIK
Date: 2026.05.11 15:57:04 +0530

**(मधुसूदन दिनकर महाडीक)**
**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,**
**सटाणा (कोर्ट नं.३)**

**दिनांक – ११.०५.२०२६**